**प्रेस नोट** **दिनांक ३१/०७/२०२६**

## पुर्व परिमंडळ ३ हद्दीतील २१ आरोपीतांना मुंबई शहरातुन हद्दपार केलेबाबत...

मुंबई शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, परिसरातील नागरीकांच्या जिवित व मालमत्तेचे संरक्षण करणे,तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर आळा घालण्यासाठी मा. पोलीस आयुक्त (का.व सु.) मुंबई, मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येतात.

मागील ०२ महिन्यात पुर्व परिमंडळ ३ अंतर्गत येणा-या पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगारी पुर्व इतिहास असलेल्या सराईत गुन्हेगारांचा सखोल आढावा घेण्यात आला. त्यामध्ये सातत्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारे, वारंवार गुन्हे करून सार्वजनिक सुरक्षितता धोक्यात आणणारे गुन्हेगार तसेच मारहाण व शिवीगाळ करणारे, खंडणी मागणारे, जबरी चोरी, अवैध धंदे व बेकायदेशीर कृत्य करणारे सराईत असे एकुण २१ गुन्हेगार आढळुन आले.

सदर गुन्हेगारांच्या सातत्यपुर्ण गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील सर्वसामान्य नागरीक, महिला, ज्येष्ठ नागरीक, व्यापारी व व्यावसायिक यांच्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक नागरीक हे त्यांच्या दहशतीमुळे तक्रार देण्यासही धजावत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या गुन्हेगारांविरूध्द कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक होते. त्याअनुषंगाने २१ सराईत गुन्हेगारांस पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ ३,यांनी बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीबाहेर हद्दपार केले आहेत.

सदर कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, श्री. मनोज शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, श्री. धनंजय कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ ३, मुंबई यांनी केली आहे.

-------------

<u>**बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीबाहेर हद्दपार केलेले आरोपी.**</u>

**मपोका ५५**



| अ. क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | हद्दपार दिनांक | फोटो |
|---|---|---|---|---|
| १ | भांडुप | १) संकेत संजय खैर, उर्फ गोऱ्या, वय ३२ वर्षे, (टोळी प्रमुख)<br>धंदा- नोकरी, राठि. रुम नं.०१, रामेश्वर सोसायटी,<br>चाळ नं. ०१, नरदास नगर, टेंभीपाडा, भांडुप प. मुंबई-७८ | १८/०६/२०२६ |  |
| २ | भांडुप | सोमेश सच्चिदानंद सावंत उर्फ सुम्या, वय २८ वर्षे, (टोळी सदस्य),<br>धंदा-नोकरी, राठि. रुम नं. ०८, रविदर्शन सोसायटी,<br>रामनगर, पाईप लाईनच्या वर, टेंभीपाडा,<br>भांडुप प., मुंबई - ७८ | १८/०६/२०२६ |  |
| ३ | भांडुप | १)शुभम संतोष कदम वय २६ वर्ष,(टोळी प्रमुख) राठी. रूम नं. ०६, धर्मा चाळ, पाईप लाईन, आंब्याची भरणी, तुळशेत पाडा, भांडुप प मुंबई.७८ | २३/०७/२०२६ |  |
| ४ | भांडुप | २) दत्तप्रसाद विलास परब वय- २६ वर्ष,(टोळी सदस्य) राठी. हरीगद चाळ, आंब्याची भरणी, तुळशेत पाडा, भांडुप प मुंबई.७८ | २३/०७/२०२६ |  |
| ५ | कांजुरमार्ग | १) अमन गणेश कांबळे वय २६ वर्षे,(टोळी प्रमुख), रा. ठि-ओम साईधाम संघ, रूम नं ३२०, हनुमान गल्ली, साईमंदीराजवळ, उगलेवाडी, कांजुरमार्ग (पुर्व) मुंबई ४२ | ३०/०६/२०२६ |  |
| ६ | कांजुरमार्ग | २) मित्तल रमेश भवार उर्फ चिक्या, वय ३० वर्षे,(टोळी सदस्य), रा.ठी. धुरी चाळ, रूम नं.०१, अंबिका मंदीराजवळ, हनुमान गल्ली, कांजुरमार्ग (पुर्व) मु ४२. | ३०/०६/२०२६ |  |

**मपोका ५६**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | हद्दपार दिनांक | फोटो |
|---|---|---|---|---|
| १ | **विक्रोळी** | सुशांत रमेश पाईकराव, वय २३ वर्ष, धंदा-नाही, राठी- रूम न. ३५२५, चाळ नं. ११, बि नं. ४१, पॅन्थर नगर, कन्नमवारनगर ०१, विक्रोळी, पुर्व, मुंबई | ०९/०६/२०२६ |  |
| २ | **विक्रोळी** | सतीश तानाजी पटेकर, वय ३१ वर्ष, राठि. पॅन्थर नगर झोपडपटट्टी, कन्नमवार नगर, विक्रोळी , मुंबई, | १६/०६/२०२६ |  |
| ३ | **विक्रोळी** | सचिन गणेश भोये , वय ३० वर्षे, रा.ठी. पाचुबाई चाळ, रु.नं.०१, हरियाली व्हिलेज, सिध्दीविनायक शाळे समोर,टागोरनगर, ग्रुप नं.०१,विक्रोळी पुर्व मुंबई ८३ ,मो.नं.९९८७५१२६५६ | १६/०६/२०२६ |  |
| ४ | **पार्कसाईट** | अविनाश किशोर कोकणे, वय २२ वर्षे, राठी सत्यम सोसायटी, टेकडी विभाग,दुर्गामाता मंदीर जवळ, वर्षानगर,पार्कसाईट विक्रोळी पश्चिम मुंबई | ०९/०७/२०२६ |  |
| ५ | **पार्कसाईट** | वसीम अबुबखर शेख उर्फ मडडा, वय ३३ वर्षे, राठि व्हिक्टम ग्लास कंपनीच्या मागे सुर्यानगर,विक्रोळी पश्चिम मुंबई. | ०९/०७/२०२६ |  |
| ६ | **पार्कसाईट** | विजय भारत मस्तुद वय ३३ वर्षे, रा.ठी छत्रपती शाहु महाराज सोसायटी वर्षा नगर, पार्कसाईट विक्रोळी मुबंई | १७/०७/२०२६ |  |
| ७ | **भांडुप** | इंतेजा इनायतुल्ला चौधरी, वय ३६ वर्षे,धंदा-फ्रिज रिपेरिंग, राठि. रुम नं. ५३,विराज नगर चाळ, दुर्गा क्रॉस रोड, अरफात हॉस्पीटल जवळ, सोनापुर,भांडुप प., मुंबई-७८ | ११/०६/२०२६ |  |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | **भांडुप** | गणेश शंकर जाधव, ४९ वर्षे,<br>धंदा- बिगारी, राठि. रुम नं. ०१,<br>शंकर दुर्गाप्पा जाधव चाळ, गणेश नगर,काजु टेकडी, भांडुप प., मुंबई-७८. | २०/०६/२०२६ |  |
| ९ | **भांडुप** | नाना शेखर सुब्रमण्यम शेट्टी, ५० वर्षे,<br>राठि.रुम नं.१०, विजय निवास,<br>जंगलमंगल रोड, भांडुप प., मुंबई-७८ | १५/०६/२०२६ |  |
| १० | **कांजुरमार्ग** | संतोष काशिनाथ माने, वय ४२ वर्षे,<br>रा.ठि. पडकी इमारत क्रमांक २ च्या खाली झोपडीत, शामनगर झोपडपट्टी, भांडुप (पुर्व) मुंबई | १८/०६/२०२६ |  |
| ११ | **मुलुंड** | राज एकनाथ भालेराव उर्फ माडक्या वय २५ वर्षे, धंदा-नाही ,रा.ठी. रूम नं ०६,<br>बाबूजगजीवन रामनगर,<br>बुध्द विहाराचे पाठीमागे, डम्पींग रोड,<br>मुलुंड पश्चिम मुंबई . | ०४/०६/२०२६ |  |

**मपोका ५७**

| अ. क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | हद्दपार दिनांक | फोटो |
|---|---|---|---|---|
| १ | **विक्रोळी** | हनिफ अबुबकर शेख वय ४२ वर्षे,रा.ठी. राजीवगांधी नगर, टागोरनगर, ग्रुप नं.४, सार्वजनिक शौचालयाच्या बाजुला रोडवर विक्रोळी पुर्व मुंबई ८३. | २०/०६/२०२६ |  |
| २ | **भांडुप** | आफ्रिन मोसीम शेख उर्फ चिंगी, वय ४० वर्षे, रा.ठि. रुम नं. २७, साई बाबा चाळ,महालक्ष्मी मंदिरच्या बाजुला, डकलाईन रोड, तुळशेतपाडा, भांडुप(प),मुंबई-७८. | ०७/०७/२०२६ |  |
| ३ | **भांडुप** | रवि रामेश्वर उर्फ रामधवर चौहान, वय ३९ वर्षे, धंदा- नाही, राठि. मॉडर्न टेलरच्या पाठीमागे, गौतम नगर, गावदेवी रोड, भांडुप प., मुंबई-७८ | २१/०७/२०२६ |  |
| ४ | **मुलुंड** | सचिन सुरेश जाधव वय-३६ वर्षे, रा.ठी- मु-देवरूग. पो-लोणाड, ता-भिवंडी, जि-ठाणे. | ०९/०७/२०२६ | |

मुंबई पोलीसांकडुन करण्यात आलेली ही कारवाई गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर प्रभावी प्रतिबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असुन संघटित गुन्हेगारी , दादागिरी करणे , हप्तेवसुली करणे, खंडणी मागणे, शस्त्रांच्या धाकाने नागरिकांना त्रास देणाऱ्या प्रवत्तींवर आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे. अशा प्रतिबंधात्मक कारवायांमुळे कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होणार असून नागरीकांना सुरक्षित , शांततापुर्वक व निर्भय पुर्वक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या मुंबई पोलीसांच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळणार आहे.

पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ ३ मुंबई यांच्या अधिनस्त सर्व पोलीस ठाण्यांना हद्दपार आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. हद्दपार करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती आदेशाचे उल्लंघन करून मुंबई उपनगर जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करताना अथवा वास्तव्यास असल्याचे आढळुन आल्यास तिच्याविरूध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित तरतुदीनुसार तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मुंबई पोलीस नागरीकांना आवाहन करीत आहे की,आपल्या परिसरात कोणताही हद्दपार गुन्हेगार अथवा संशयीत व्यक्ती वावरत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ संबंधीत पोलीस ठाण्यास किंवा मुंबई पोलीस आपत्कालीन क्रमांक १००/११२ वर कळवावी. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख पुर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

'सुरक्षित मुंबई, निर्भय नागरीक' हे ध्येय साध्य करण्यासाठी मुंबई पोलीस अशा प्रकारच्या प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाया भविष्यातही अधिक प्रभावीपणे व सातत्याने राबवत राहतील.